माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३

जावक क्र. :- 3822 दिनांक :- 13-9-24

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/४४३०
दि २९/०८/२०२४

१. अपिलकर्ता
प्रति,
श्री.अविनाश लहाडे
राहणार :- शिवशंभोनगर, लेन नं. – ४,
कात्रज रस्ता, पुणे ४११०४६
मोबाईल क्र. ८३८१०३८१८३

२. श्री. सुभाष तळेकर, जन माहिती अधिकारी तथा,
क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक, अतिक्रमण विभाग
पुणे महानगरपालिका.

श्री. अविनाश लहाडे
विरूध्द
श्री. सुभाष तळेकर जन माहिती अधिकारी तथा,
क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक, अतिक्रमण विभाग पुणे महानगरपालिका.

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

अपिलकर्ता श्री.अविनाश लहाडे यांचा माहिती अधिकार अर्ज आ.क्र. ३४२० दिनांक २९ /०७/२०२४ रोजी कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त झाला. सदर अर्जात अनधिकृत हातगाड्या व पानशॉप कायदेशीर कारवाई होणेबाबत संदर्भांचा अर्ज दि. ११/०७/२०२४ आपल्या कार्यालयास प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपास व इतर कागदपत्राच्या संक्षिप्त प्रती मिळणे बाबत अर्ज दाखल केला होता त्यास अनुसरून जा.क्र. २७२१ दि. २६/०८/२०२४ अन्वये पुढीलप्रमाणे कळविले आहे. "सदरचे पत्र जागेच्या अभिप्रायाबाबत मा. उप अभियंता मालमत्ता व व्यवस्थापन विभाग पुणे मनपाकडे जा.क्र. २०४६ दि. २४/०७/२०२४ ने पाठविले आहे . त्याची प्रत सोबत जोडून पाठवीत आहोत." असे कळविले आहे.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २९/०७/२०२४ | २९/०८/२०२४ | जा.क्र. २७२१ दि.२६/०८/२०२४ | निरंक | जा.क्र. २७२१ दि.२६/०८/२०२४ |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री. अविनाश लहाडे यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे– "दि.११/०७/२०२४ रोजीच्या प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची कागदपत्रे व माहिती मिळाली नाही तसेच दि. २९/०७/२०२४ रोजीच्या माहिती अधिकार अर्जातील माहिती मिळाली नसल्यामुळे अपील दाखल केले आहे. "

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २९/०९/२०२४ | २९/०८/२०२४ | होय | - | ६/०९/२०२४ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. १२/०९/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | सदर अर्जात अनधिकृत हातगाड्या व पानशॉप कायदेशीर कारवाई होणेबावत संदर्भाचा अर्ज दि. ११/०७/२०२४ आपल्या कार्यालयास प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपास व इतर कागदपत्राच्या संक्षिप्त प्रती मिळणे बाबत अर्ज दाखल केला होता | होय<br>जा.क्र. २७२१ दि. २६/०८/२०२४ अन्वये पुढील प्रमाणे कळविले आहे. "सदरचे पत्र जागेच्या अभिप्रायाबाबत मा. उप अभियंता मालमत्ता व व्यवस्थापन विभाग पुणे मनपाकडे जा.क्र. २०४६ दि. २४/०७/२०२४ णे पाठविले आहे . त्याची प्रत सोबत जोडून पाठवीत आहोत." असे कळविले आहे. |

## विवेचन

माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी श्री. अविनाश लहाडे तसेच जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक हे उपस्थित होते. सदर सुनावणी वेळी अपिलार्थी यांनी माहिती उपलब्ध करून दिली नाही म्हणून अपील दाखल केल्याचे सांगितले यावर जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता सदर अर्जात नमूद केलेप्रमाणे माहिती जा.क्र. २७२१ दि. २६/०८/२०२४ अन्वये उपलब्ध करून दिली असल्याचे सांगितले सदरचे पत्र अपिलार्थी यांना टपालाने पाठविले असल्याने त्यावाबतची पोहोच पावती देखील दाखवण्यात आली. यावर अपिलार्थी यानी पत्र मिळाले नसल्याचे सांगितले. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक यांनी जा.क्र. २७२१

दि. २६/०८/२०२४ अन्वये उपलब्ध करून दिलेली माहिती दि. १२/०९/२०२४ रोजी पुन्हा हातोहात उपलब्ध करून दिली. अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असे नमूद करून आपली स्वाक्षरी केली आहे.

**-: आदेश :-**

जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक श्री. सुभाष तळेकर यांनी अपिलार्थी यांनी अर्जामध्ये मागणी केलेली दि. १२/०९/२०२४ रोजी अपिलार्थी यांना हातोहात विनामुल्य उपलब्ध करून दिली आहे व अपिलार्थी यांनी त्यावर मला माहिती मिळाली असे नमूद करून स्वाक्षरी केली आहे. सबब सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

(हेमंत मा. किरूळकर)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाणः ३०/०८/२०२४ ,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.